
म. ग्रं. सं. ठाणे
विषय
सं. क्र.

…ध माला—पुष्प चौथें.

…प्रांत सरकारांनीं बक्षीस,

…लायब्ररीसाठीं मंजूर केलेलें.

# बालविवेकानन्दांची शिकवण.




REFBK-0005078

मुंबई, वऱ्हाड, मध्यप्रांत सरकारांनीं, लायब्ररीसाठीं मंजूर केलें.

चित्रमय बालबोध माला पुष्प चौथें.

" मनुष्य ही चैनीची वस्तु नसून कर्तव्याची भूमिका आहे. "

विवेकानन्द.



# बालविवेकानन्दांची शिकवण.

लेखक


एस्. एम्. शेख,

आर. डी. गुरव

शिक्षक तासगांव, जि. सातारा.



REFBK-0005078



आवृत्ति दुसरी. प्रती एक हजार.

किंमत २ आणे.

सन १९३५.

# प्रस्तावना.

स्वामी विवेकानंदांचें नांव आपल्या देशांत कोणास ठाऊक नाहीं असें नाहीं. त्यांचें चरित्रही आतां प्रायः सर्वांच्या वाचनांत आलेलें आहे. परंतु त्यांचें वैराग्य, त्यांची ईश्वरभक्ति, त्यांचें ब्रह्मज्ञान किंवा त्यांचे देशभक्तीचे विचार हे लहान मुलांच्या आकलनांत येण्याजोगे नसल्यामुळें, त्यांना त्यांची ओळख करून देणें अशक्य होतें! त्यामुळें त्यांच्या बालपणच्या कांहीं गोष्टी एकत्र करून त्या लहानशा पुस्तकाच्या रूपानें प्रसिद्ध केल्यास मुलांस त्यांचा उपयोग होइल असें वाटून, हा उपक्रम आम्हीं केला आहे.

आतां स्वामी विवेकानंदांप्रमाणें सर्वच लोक कांहीं संसार सोडून देवाच्या मागें लागणारें नसतात, हें उघड आहे. तेव्हां विरक्त आणि संन्यासी स्वामींच्या चरित्रांतील बालपणच्याही सर्व गोष्टी आमच्या मुलांना सर्वथा अनुकरणीय होतील असें नाहीं, हें उघड आहे. तथापि पुढें उदयास आलेल्या थोर पुरुषाचें तेज बालपणींही कसें ठिकठिकाणीं चमकत असतें हें जाणून घेण्याचे कामीं या पुस्तकाचा खास उपयोग होणार आहे, व त्याच दृष्टीनें तें वाचकांनीं वाचावें, अशी आमची विनंति आहे, असो.

तासगांव } लेखक,
ता. ५-४-१९३०

# दुसऱ्या आवृत्तीची प्रस्तावना.

परमेश्वरकृपेनें द्वितीय आवृत्ति काढणेंचा सुयोग आला, याबद्दल आनंद वाटतो. या आवृत्तींतील किरकोळ दोष सुधारले, यामुळें पुस्तक मोहक झालें असून, उपयुक्तताही वाढली आहे. हें पुस्तक मुंबई, मध्यप्रांत व वऱ्हाड सरकारांनीं लायब्ररी व बक्षीसासाठीं मंजूर केलें, याजबद्दल त्यांचे मनापासून आभार मानतों. तसेंच श्री० शं० न० जोशी, मॅनेजर चित्रशाळा प्रेस, यांनीं सर्व छपाईचें काम व्यवस्थेशीर करून दिलें, याबद्दल त्यांचे आभार मानावे तेवढे थोडेच आहेत. असो. ही आवृत्ति लवकरच खपो एवढें ईश्वरचरणीं मागणें मागून आम्ही प्रेमानें सर्वांची रजा घेतों.

तासगांव } लेखक.
१०।३।३५

# बालविवेकानंदांची शिकवण

४०५८

## शिकवण १ ली.

## आईची थोरवी !

आपल्या घरच्या व्यवस्थेंत आईचा मान पहिला आहे. तिच्या मनाप्रमाणेंच कुटुंबांतील सर्व कामें चालतात. आईसंबंधीं सर्वच धर्मांच्या लोकांत पूज्यभाव वसत असल्यानें ती देवता म्हणून समजली जावी हें स्वाभाविक आहे. कारण आपल्या आईला भेटण्यास कोणा-लाही कधींच कठीण वाटत नाहीं. आपण हजारों अपराध केले असले तथापि त्यामुळें आपल्यावरील आईचें प्रेम थोडें देखील कमी न होतां ती आपल्या अपराधांवर प्रेमाचें पांघरूण घालतें. मनुष्यजातींत मूल आणि आई हा संबंध अतिशयच जवळचा आहे. म्हणूनच कस-ल्याही दुःखद प्रसंगीं आपल्या तोंडून 'आई' किंवा 'मा' हाच एक शब्द निघत असतो आणि आपणांस मन मोकळें करून तिच्याशीं हवें तसें वागतां येतें. अशा वागण्यास उतावळेपणा हें नांव शोभणार नाहीं. जसें लडिवाळपणानें व हट्टानें आपण आईशीं वागत असतों त्याचप्रमाणें भक्त ईश्वराशीं वागत असतो. म्हणूनच देव आणि भक्त यांच्यांतील संबंध आई आणि मूल यांच्या संबंधासारखा आहे.

देवासंबंधानें बोलतांना इस्लाम धर्माचे संस्थापक हजरत मोहंमद (स्व.) पैगंबर साहेबांनीं एकदां असे उद्गार काढले कीं, 'देव इतका मायाळू

आहे कीं, त्याच्या दयेपुढें त्याचा राग मुळींच टिकत नाहीं !' हेच शब्द आपल्या आईस लागू पडतात. आईजवळ इतकें प्रेम भरलें आहे कीं त्यापुढें ती आपल्या जिवाचीही पर्वा ठेवीत नाहीं. हें ओळखूनच विवेकानंद आपल्या आईला देवतेप्रमाणें पूज्य मानीत असत.

आईचा उपदेश अगदीं साधा आणि सोप्या शब्दांत सांगितलेला असतो. प्रत्येक आई आपल्या मुलाला दोन हिताचे शब्द सांगत असते. मुलाच्या स्वभावसामर्थ्याची जाणीव प्रत्येक आईला असते, आणि अशाच आयांच्या तालमींत जगांत थोर म्हणून नांवाजलीं जाणारीं मुलें तयार होतात. म्हणूनच ती केवळ जन्म देणारी नसून अनेक प्रकारें मुलाच्या उन्नतीस कारणीभूत होते. असो.

अशा आपल्या मातेविषयीं आदरबुद्धि ठेवून तिचें चित्त उदास आणि उद्विग्न झालें आहे असें समजतांच बाल विवेकानन्द तिची भेट घेऊन तिला धीर देत, व तिचें हरप्रकारें समाधान करीत. आईची आज्ञा शिरसावंद्य मानीत. आईनें अमुक कर म्हणून सांगितलें असतां 'कां ?' हा प्रश्न त्यांनीं कधीं केला नाहीं !

सारांश, स्वाभिमान, मर्दपणा, उच्च विचार आणि शुद्ध आचरण इत्यादि गुणांचा उपदेशरूपी बहुमोल ठेवा ज्या आईपासून मिळतो तिची जितकी थोरवी गावी तितकी थोडीच होणार; करितां बालविवेकानन्दांनीं आपल्या आईसंबंधीं आज्ञा पाळून जी वरील प्रकारची शिकवण दाखवून दिली आहे, ती प्रेमानें अंतःकरणांत ठेवून प्रत्येकानें आईच्या आज्ञेंत राहावें; त्यांतच आपला भाग्योदय होणार आहे.

## शिकवण २ री.

# ' सत्य शोधून काढा. '

पुष्कळ वेळां असें होतें कीं, मुलांना अभ्यासही करावयाचा नसतो व खेळावें म्हटल्यास त्या वेळीं तशीं साधनेंहि मिळत नाहींत. असा वेळ त्यांना फार कंटाळवाणा जातो. असें झाल्यावर विवेकानन्द लहानपणीं आपल्या मित्राकडे भर दोन प्रहरीं जात असत. या मित्राच्या आंगणांत एक चाफ्याचें मोठें झाड होतें. त्या चाफ्याचीं फुलें त्यांना फार आवडत. देवाला फुलें फार प्रिय असल्यामुळें तीं आणावयास कितीही लांब जावें लागलें, तरी मुलांना त्यांत आनंदच वाटतो ! एके दिवशीं चाफ्याच्या झाडाला टांगून घेऊन ते मौजेनें झोके घेत असतां घरांतील आजोबांनीं पाहिलें. आजोबांचें विवेकानन्दावर फार प्रेम असून ते त्याला भला मुलगा मानीत. उलटे झोके घेतांना हा कदाचित् पडेल आणि अपघात होईल, या भीतीनें किंवा यानें चाफ्याचीं फुलें काढूं नयेत म्हणून, ते विवेकानन्दाजवळ जाऊन म्हणाले–' बाळ, या झाडावर पुन्हां चढूं नको हो !' विवेकानन्दांनीं त्याचें कारण विचारतां आजोबा म्हणाले, 'बाळ ! या चाफ्यावर एक मोठा राक्षस राहतो. तो पांढरे कपडे आंगावर घेऊन रात्रीचा बाहेर फिरतो. त्याला पाहून लोक भयभीत होतात ! '

राक्षसाचें नांव ऐकतांच विवेकानन्दांना आश्चर्य वाटलें ! व त्यांनीं आजोबास प्रश्न केला, 'तो काय करितो ? ' आजोबांनीं उत्तर दिलें

"'या चाफ्यावर चढणारांच्या तो मानेवर बसतो!'' हें उत्तर ऐकून विवेकानन्द गप्प राहिले. आपलें काम झालें, म्हणून आनंदानें म्हातारा घरांत गेला. तो घरांत जाऊन पोहोंचला असेल नसेल, तोंच 'राक्षस मानेवर कसा बसतो' हें पाहण्याकरितां पूर्वींप्रमाणें चाफ्यावर चढून विवेकानन्द झोके घेऊं लागले! त्यांचा मित्र तेथें होता, तो म्हणाला—'विवेकानन्द, तो राक्षस खरोखरच तुझ्या मानेवर बसेल!' मित्राच्या अशा समजुतीवर त्यांना हसूं आलें. ते म्हणाले, 'अरे! तूं किती वेडा आहेस! दुसरा म्हणतो म्हणून ती गोष्ट खरी मानूं नकोस! आजोबांच्या म्हणण्याप्रमाणें या चाफ्यावर खरोखरच राक्षस असता तर यापूर्वींच तो माझ्या मानेवर बसला नसता काय?'

अशा प्रकारचे प्रसंग पुष्कळ मुलांच्या लहानपणीं घडून येतात. मात्र स्वतःची खात्री करून घेतल्याशिवाय कोणत्याही गोष्टीवर विश्वास ठेवूं नये, 'सत्य शोधून काढावें,' याचेंच नांव 'अनुभव.'

बालमित्रांना विवेकानंदांनीं ही दिलेली उपदेशपर शिकवण लक्षांत ठेवण्यासारखी आहे.

## शिकवण ३ री.

# परोपकाराची कमाल.

मुलांना आपल्या दारासमोर साधु, फकीर किंवा भिकारी दिसला कीं, तीं घरांत जाऊन जी वस्तु हातांत पडेल ती त्याला देण्याला मागें-पुढें पहात नाहीं. या खोडीबद्दल त्यांना कित्येक वेळां मारही बसतो !

एके दिवशीं विवेकानंदांना नेसण्याकरितां हातमागावर विणलेलें धोतर देण्यांत आलें होतें. धोतर नेसण्याचा हा त्यांचा पहिलाच दिवस. वयानें अवघे तीन चार वर्षांचे विवेकानंदजी तें धोतर नेसून मोठ्या ऐटीनें बसले होते. इतक्यांत हातांत लोटा घेतलेला एक साधु आपल्या नेहमींच्या पद्धतीप्रमाणें तोंडानें हरिनामाचा उच्चार करीत, वाड्या-समोर दत्त म्हणून उभा राहिला. भगवंताचें नांव कांनीं पडतांच विवे-कानंदांच्या अंगावर काटे उभे राहिले, आणि मन खूष होऊन ते आनंदानें धावत धावत, उड्या घेत साधूकडे गेले. "बाळ ! मला एकादें जुनेंपानें धोतर दे." असें तो साधू विवेकानंदांना म्हणाला. साधूचे हे केविलवाणे शब्द ऐकतांच विवेकानंदांचें मन विरघळलें. आणि लगेच विचार न करतां त्यांनीं आपलें नेसलेलें धोतर सोडून साधूला देऊन टाकलें ! विवेकानंदांना आपलें धोतर फारच आवडत होतें. परंतु साधूनें धोतर मागतांच त्यांची आवड एकदम नाहींशीं होऊन, त्यांनीं आपलें धोतर साधूच्या स्वाधीन केलें. विवेकानंदांची ही "परोपकाराची कमाल" पाहून साधूला मोठें कौतुक वाटलें ! धोतर

लहान असल्यानें तें डोकीस गुंडाळून साधू तेथून लौकरच पुढें निघून गेला !

पुढें ही गोष्ट घरांतील मंडळीला समजली ! रस्त्यांतील बैराग्याला धोतर देऊन टाकल्याबद्दल विवेकानंदांना खूप मार बसला. त्यानंतर वाड्यांत कोणी संन्यासी किंवा साधु आला, म्हणजे विवेकानंदांवर चांगली पाळत राखावयाची असा घरांतील मंडळीनें निश्चय केला. इतका कीं, वेळप्रसंगीं त्यांना पकडून खोलींत कोडूनही ठेवावें लागत असे; तथापि विवेकानंदांच्या मनावर त्याचा कांहींच परिणाम होत नसे. कारण वाड्यांतून एकदां साधु बाहेर पडला आणि मग त्यांना खोलींतून बाहेर काढण्यांत आलें, म्हणजे घरांतील जी चांगली वस्तु त्यांच्या हातीं लागेल, ती उचलून मंडळींच्या न कळत ते वाड्याच्या एकाद्या खिडकींतून साधूच्या अंगावर फेकून मोकळे होत असत.

अशा प्रकारें दानशूरतेची किंवा परोपकाराची कमाल ही शिकवण बाल विवेकानंदांच्या वृत्तींत या वयांतही इतकी बाणून गेली होती कीं, त्या बाबतींत त्यांनीं कोणत्याही अडचणीला जुमानलें नाहीं !

---

### शिकवण ४ थी.

# मनाची एकाग्रता.

लहान मुलांना संन्यासी, साधु, किंवा अवलियांच्या गोष्टी सांगण्यांत येतात, यांतील खुबी तरी हीच आहे कीं, राष्ट्राच्या उच्च कल्पना त्यांच्या मनावर उत्तम प्रकारें ठसाव्यात आणि सर्व बाजूंनीं सुधारणा होऊन तीं नीतिमान व्हावींत. याच कारणासाठीं वरील प्रकारच्या साधूंचा परामर्ष घेण्याविषयीं सर्व धर्मांतून आपआपल्या अनुयायांना आज्ञा आहेत. या आज्ञेवरूनच विवेकानंदांनीं साधुसंतांसंबंधानें ते ध्यान लावून कसे बसतात वगैरेंची चांगलीच माहिती करून घेतली होती. व तशा योग्यांवर बालविवेकानंदांचें अतिशय प्रेम असे. इतकेंच नव्हे तर कित्येक वेळां आपणही त्यांच्याप्रमाणें वागण्याचें ठरवून एक लंगोटी नेसून मनाची एकाग्रता करण्याचा प्रयत्न ते करून पाहात असत ! तें पाहून 'विवेकानंद! अरे तूं हें चालवलें आहेस तरी काय?' असें आईनें घाबऱ्या स्वरानें विवेकानंदांना विचारिलें; तोंच संन्याशाप्रमाणें एक लंगोटी नेसून, 'आई, बघ मीं आतां साधु झालों !' असें म्हणत ते मोठ्या ऐटीनें आईकडे धावत गेले !

शरिराचा विसर पडलेले संन्यासी केवळ एक लंगोटीच नेसत असतात. घरांतील मंडळीनें तें पाहून थट्टेनें त्यांना सांगितलें कीं तूं बराच वेळ मनाची एकाग्रता करून (ध्यान लावून) बसशील तर साधूप्रमाणें तुझ्याही डोक्यावर लांब लांब जटा (केस) वाढतील. जटाजूट व्यवस्थित व कुशलतेनें बांधल्यास दुरून पाहणारास तो सुंदर दिसतो; अर्थात् आपण ध्यान लावून बसलों, तर आपल्याही जटा वाढतील,

२

आणि मग तो केसांचा पुंजका किरीटाप्रमाणें आपल्या मस्तकावर शोभूं लागेल, या आशेनें बालविवेकानंद एक दिवस आसन घालून ध्यान करीत बसले! घरांतील मंडळी आपली थट्टा करतात, हें भोळ्या बालविवेकानंदांच्या लक्षांत आलें नाहीं, त्यांना तें खरें वाटलें. त्यांनीं आपले डोळे मिटले, आणि दृष्टि नाकाच्या टोंकावर स्थिर करून तें योग्याप्रमाणें सर्व कृति करूं लागले!

अशा प्रकारें योगाभ्यासांत सुमारें एक तास गेल्यावर, त्यांना जटांची आठवण झाली. आपल्या मस्तकावर जटा वाढल्या काय? न जाणों कदाचित् वाढल्या असतील! हात लावून पहावा असें मनांत घेऊन त्यांनीं डोक्याला हात लावून पाहिला. परंतु जटा वाढलेल्या नाहींत, हें पाहून त्यांची फार निराशा झाली. घरच्या मंडळींचें म्हणणें खोटें कसें झालें, याचें त्यांना आश्चर्य वाटलें आणि हें विचारण्याकरितां ते घरांत धांवत गेले. 'मी एक तासभर ध्यान लावून बसलों, तथापि अजून जटा कशा वाढल्या नाहींत?' म्हणून आईला विचारिलें. 'बाळ, तास दोन तासानें का कोठें जटा वाढतात? त्या वाढण्याला महिनेच्या महिने व वर्षांच्या वर्षें जावीं लागतात,' असें आई म्हणाली.

उघडच आहे! जगांतील सुखें हीं केवळ दुःखदायक होत. खरें सुख किंवा खरा आनंद ईशचिंतनांतच आहे. इतकी विचारशक्ति बळकट होण्यास कित्येक वर्षांचा काळ जावा लागतो. अशा प्रकारें योगी आणि मुनि यांचे अनुभव येणाऱ्या ध्यानाचें सार बालविवेकानंदांच्या वरील शिकवणींत आलें आहे.

शिकवण ५ वी.

# जातिभेदाचें बंड !

६०७८

विवेकानंदांचे वडील वकील असल्यानें त्यांच्या घरीं निरनिराळ्या जातींचे, धर्मांचे लोक येत असत. ते सर्वजण एका सुंदर दिवाणखान्यांत वकीलसाहेबांची वाट पहात बसत. दिवाणखान्याच्या एका कोपऱ्यांत एक मुसलमान गृहस्थ बसला होता. इतरांच्या गप्पागोष्टींत तो मिसळत नसे; मात्र हुक्का (गुडगुडी) ओढतांना मधून मधून 'या खुदा ! या अल्ला !!' असें म्हणून दुःखाचे सुस्कारे सोडीत होता. अशा प्रकारें त्या मुसलमानाच्या तोंडून उद्गार निघत असतां त्यानें सावकाश एक जांभई दिली; इतक्यांत बाल विवेकानंद उघडेबोडके दिवाणखान्यांत धांवत आले. त्यांना पाहातांच मुसलमान गृहस्थानें 'बेटा, इकडे ये.' असें म्हणतांच विवेकानंद त्याच्याकडे मोठ्या आनंदानें धांवत गेले, आणि शेजारीं जाऊन बसले. या मुसलमानाला ते 'काकाजी' म्हणत. हे काकाजी बालविवेकानंदांवर फारच प्रेम करीत व त्यांना पंजाबांतून अफगाणिस्थानांत जाणाऱ्या लमाणांच्या अद्भुत गोष्टी सांगत असत. त्या ऐकून त्यांना मोठी मौज वाटे. यामुळें या मुसलमान काकाजीवर विवेकानंदांचेंही विलक्षण प्रेम बसलें होतें.

पुढें काकाजींनीं खाऊ म्हणून बालविवेकानंदांना एक प्रकारची बंगाली मिठाई आणून दिली; त्यांनीं तीं खाल्ली. हें पाहून सर्वांना मोठें आश्चर्य वाटलें ! हें मोठें पाप केलें, हा बाटला, म्हणून सर्वांनीं कपा-

ळाला आठ्या घालून,काकाजींकडे पहात बालविवेकानंदांची त्यांनीं छीः ! थूः ! ! चालविली. तोंच विवेकानंदांचे वडील विश्वनाथ बाबू दिवाणखान्यांत आले व विवेकानंद बाहेर खेळण्याकरितां निघून गेले. खेळून आल्यानंतर जातिभेद हें काय कोडें आहे ? एकानें दुसऱ्याकडे कां जेवूं नये? तसें केल्यास काय होईल ? परजातीच्या गृहस्थांच्या हातची मिठाई खाल्ली तर आपल्या डोक्यावर घर कोसळून पडेल काय ? किंवा आपण तावडतोब मरूं काय ? असे अनेक प्रश्न त्यांच्या मनांत उत्पन्न झाले; परंतु कांहींच उलगडा होत नसल्यानें त्यांनीं सर्व जातींच्या लोकांचे हुक्के ओढून पाहिले, पण मी कांहीं मेलों नाहीं किंवा हें जगही बुडालें नाहीं, सर्व कांहीं आहे तसेंच आहे, असा त्यांस अनुभव आला !

अशा प्रकारची कृति व विचार करीत असतां वडील दिवाणखान्यांत आले. ‘ कायरे, काय चाललें आहे ? ’ म्हणून त्यांनीं प्रश्न केला. ‘ जातिभेद मोडला तर काय होईल, याचा मी प्रयोग करून पहात आहें.’ असें ते म्हणाले. बालविवेकानंदांचें हें उत्तर ऐकून, बाबूजींना हसूं आलें; व त्यांच्या बुद्धिमत्तेचें कौतुक करीत, ते आपल्या खोलींत निघून गेले.

अशा रीतीनें पोरवयांतही विवेकानंद आपल्या खेळांत जातिभेदाला पायाखालीं तुडवीत होते, थोर वयांत पुढें स्वामी झाल्यावर त्यांची ही बालपणची शिकवण, अनुभव व शिक्षणानें त्यांत योग्य तो फरक होऊन, कायम झाली असें स्पष्ट दिसून येतें.

### शिकवण ६ वी.

# धाडसाची कमाल !

लहान मुलांना खेळ फार आवडतात; व त्यांच्या लहानपणचे हे खेळ म्हणजेच पुढील आयुष्यक्रमांतील महत्त्वाचें शिक्षण होय. खेळांत झालें तरी विवेकानंद लहानपणापासून, आपल्या सोबत्यांत पुढारीच होते. खेळांत काय, अभ्यासांत काय, त्यांचा चळवळ्या स्वभाव दिसून येत असे. ते शाळेंत बांकावर नीट कधींच बसत नसत, बालवयाप्रमाणें त्यांचे प्रत्येक खेळ चालू असत. ते खेळूं लागले, म्हणजे खेळालाही कांहीं सुमार नसे. गोट्या खेळणें, उड्या मारणें, धांवणें, ठोसाठोसी हे त्यांचे नेहमींचे खेळ असत.

मुलांचे खेळ म्हटले कीं, त्यांत भांडणें व्हावयाचींच, हीं सर्व भांडणें अखेर विवेकानंदांकडे जात आणि ते त्यांचा निकाल लावीत. खेळांत अशा प्रकारची तक्रार, किंवा मारामारी होणें, त्यांना बिलकूल खपत नसे. अशी वेळ आलीच तर, स्वतः मध्यें पडून मारामारी करणारांला ते दोन बाजूंस करीत. असें करतांना कित्येक वेळां दोन्ही बाजूंकडील बुक्यांचा मार त्यांना खावा लागे; परंतु तसला प्रसंग आला असतां, न भितां, ते धाडसानें पुढें होत.

एकदां विवेकानंद आपल्या सोबत्यांसह फिरावयास गेले. निरनिराळ्या भागांत फिरून, खेळून परत येतांना, तीं सर्व मुलें नावेंत बसलीं. त्यांत एक मुलगा आजारी होता. तो नावेंतच परसाकडे बसला.

हें पाहून खलाशी रागावले व ही घाण काढून टाकण्याबद्दल त्यांनीं मुलांना धमकी देऊन सांगितलें, पण कोणींच ऐकलें नाहीं. नाव घाटाजवळ आली, तेव्हां खलाशी कोणासच उतरूं देईनात. हें विवेकानंदांनीं पाहिलें, व चटकन् खालीं उडी मारून, दोन सोजीर इकडे तिकडे हवा खात फिरत होते, त्यांना मोडक्या तोडक्या इंग्रजी भाषेंत सर्व हकीकत सांगितली. लागलीच त्या सोजिरांनीं खलाशांस दटावून सर्वांना घाटावर उतरून घेतलें. मुलांना असें अडवून धरल्याबद्दल सोजीर डोळे वटारून त्या खलाशाकडे पहात होते.

त्यांनीं संकटांतून सोडविलें म्हणून मुलें, साहेबांना सलाम करून भीतीनें मान खालीं घालून, दूर अंतरावर उभीं राहिलीं ! हें पाहून बालविवेकानंद त्यांना म्हणाले, ' अरे ! तुम्ही असे भितां कां ? ' तेव्हां एका मुलानें उत्तर दिलें " अरे ते साहेब ! पण त्यांच्याशीं तूं बोलत होतास ! तुझ्या धाडसाची कमाल आहे ! "

चाळीस पन्नास वर्षांपूर्वीं साहेबाला लोक फार भीत असत, म्हणून त्या वेळीं या बालविवेकानंदांच्या धाडसाचें कौतुक सर्वांना वाटणें साहजिक आहे, असो.

आपल्या पुढील आयुष्यक्रमांत वाटेल त्या संकटांतून पार पडण्याकरितां, अत्यंत महत्त्वाची अशी ही बालविवेकानंदांची धाडसाची शिकवण कोणीही विसरतां कामा नये !

## शिकवण ७ वी.

# अलौकिक कल्पकता !

लहान मुलांना कुत्रें, मांजर, लहानसें जनावर, पोपट, कबूतर, इत्यादि पशुपक्ष्यांशीं खेळण्याचा फार नाद असतो: त्यांच्या गळ्यांत, पायांत कल्पकतेनें बारीक घुंगूर बांधून, रंगवून तीं त्यांना आपल्या इच्छेप्रमाणें बसवून, उड्या मारवून, उडवून मनाची हौस फेडतात. विवेकानंदांनाही अशा प्रचाराचा फार नाद असे. त्यांतल्या त्यांत धुराच्या कारखान्याचा खेळ खेळण्यांत त्यांना विशेष मौज वाटे. कारण धुराचे दिवे त्या वेळीं नुकतेच सुरू झाले होते. जस्ताचीं जुनीं नळकांडीं, स्वयंपाकाचीं मडक्ीं आणि गवत यांच्या साहाय्यानें त्यांनीं आंगणांत धुराचा एक कारखाना उभा केला होता. गवत पेटलें म्हणजे त्यांतून एक प्रकारचा धूर निघत असे. तो पाहून सर्व कलकत्ता शहराला धूर पुरविण्याचा हाच कारखाना आहे, असें त्यांना वाटे! ते गवतांतून धूर निघून नळ्यांतून बाहेर पडतांना आपल्या कल्पकतेचें कौतुक करीत कारखान्याकडे पहात उभे राहात! अशा वेळीं बाल-विवेकानंदांना, व त्यांच्या धुराच्या कारखान्याला पाहून कोणालाही मौज वाटून हसूंच येई.

अशा प्रकारें रोज नवीन नवीन मौजेचे प्रकार शोधून,काढण्यांत ते गढून जात. एकदां अमुक एक करावयाचें असें त्यांच्या मनानें घेतलें कीं, तें होईपर्यंत त्यांना चैन म्हणून पडत नसे. शेजारीं जितकीं

घरें होतीं; त्या सर्व घरांत ते कांहीं तरी कल्पकता लढवून, जात येत असत. वेळप्रसंगीं ते आपल्या पोरचेष्टांनीं आणि विनोदी भाषणानें सर्व लहानथोरांना हसवून सोडीत. शेजारच्या बायकांना त्यांच्या वयाप्रमाणें कोणास मावशी, तर कोणाला ताई म्हणत. भंगिणीलाही ते मावशी म्हणण्यास मागें पुढें पाहात नसत, हें पाहून सर्वांना अतिशय आनंद होत असे.

एकदां त्यांनीं लहानपणीं आपल्या मित्रांना, मेजवानी करण्याचें ठरवून प्रत्येकानें आपापल्या ऐपतीप्रमाणें तिचा खर्च द्यावा, असें ठरविलें. शेवटीं सर्व विवेकानंदांनींच करून, ते स्वतः मुख्य आचारी बनले. आपल्या कल्पकतेनें स्वयंपाकांतील कौशल्य दाखविण्याकरितां निरनिराळ्या खिचड्या, भाज्या व इतर रुचकर पक्वान्नेंही तयार केलीं. स्वयंपाक साधारण बरा झाला होता, असो.

एकंदरींत इतक्या बालवयांतही प्रत्येक कामांत विवेकानंदांनीं आपली अलौकिक कल्पकता दाखवून, अशा शिकवणींचा कित्ता सर्वांना घालून दिला, हें किती आश्चर्य ?

## शिकवण ८ वी.

# मर्दानी खेळाची हौस.

सर्व प्रकारच्या व्यायामांत, विवेकानंदांना कुस्ती व दांडपट्टा फार आवडत असे. लहानपणीं शाळेंत शिकत असतांनाच, त्यांनीं एक आखाडा काढला होता व या आखाड्यांत शरिराचे निरनिराळे अवयव आणि त्यांतील स्नायु यांची वाढ करणारे, सर्व प्रकारचे नवीन पद्धतीचे व्यायाम त्यांनीं सुरू केले होते. अशा पद्धतीचे व्यायाम कितीही अवघड असले, तरी श्रम व धाडस यांच्या जोरावर त्यांची, त्यांना पर्वा वाटत नसे.

कुस्ती किंवा दांडपट्टा खेळतांना, हालचाली फार चपळतेनें कराव्या लागतात. छातीचा निधडेपणा लागतो. उलट बाजूचे डावपेंच व वार चुकविण्याकरितां त्याच्याकडे सारखें लक्ष ठेवावें लागतें. एकंदरींत हे खेळ थोडेसे धोक्याचे असतात;परंतु एकदां ते खेळूं लाग-ल्यावर अंगांत उत्साह व आवेश उत्पन्न होऊन, मर्दपणाची जाणीव होऊं लागते. या आवडीच्या व्यायामांपैकीं दांडपट्ट्याचें शिक्षण लहानपणापासूनच विवेकानंद आपल्या एका मुसलमान मित्राजवळ शिकले होते. दांडपट्टा चांगला खेळतां येत असेल, तर वाटेल तेथें हव्या त्या संकटाशीं तोंड देऊन, त्यांतून पार पडतां येतें असा त्यांना भरंवसा वाटत असे.

विवेकानंद शाळेंत शिकत असतां, एका जत्रेंत होणारे मर्दानी

खेळ पाहण्यास, त्यांना बोलावण्यांत आलें होतें. या खेळांतील आपली हुषारी दाखविण्याकरितां म्हणून, तयार झालेले बरेच तरुण तेथें हजर होते. परंतु एकही खरा तरबेज नसल्यामुळें, खेळाला रंग चढेना. विवेकानंदांचें वय या वेळीं अवघें दहा वर्षांचें होतें, त्यांनीं एकदम खेळाच्या रंगणांत उडी टाकिली व माझ्याबरोबर पट्ट्याचे दोन हात करण्याची ज्याची हिंमत असेल, त्यानें पुढें यावें असें जाहीर केलें. जमलेल्या तरुणांतील एका पटाईत तरुणानें त्यांचें आव्हान स्वीकारलें. लागलीच सुरवात होऊन, खेळ चांगला रंगांत आला. पट्ट्याचे हात सपासप चालून, मधूनमधून त्यांचा झणझणीत आवाज होऊन, ठिणग्याही पडूं लागल्या ! तेव्हां मात्र खेळ पहावयास जमलेले लोक घाबरून गेले. इतक्यांत बालविवेकानंदांनीं एक नवा डाव केला, झटकन् बाजूला वळून त्यांनीं असा जोराचा वार केला कीं त्या तरुणाच्या हातांतील पट्ट्याचा दांडा मधोमध मोडून, सूं सूं करीत पडला ! सामना करणारा तरुण वयानें मोठा व शरिरानें अधिक मजबूत होता; परंतु त्या दिवशीं खेळांतील पहिलें बक्षीस विवेकानंदांना मिळालें.

बालविवेकानंदांनीं व्यायामाच्या जोरावर अशा प्रकारच्या " मर्दानी खेळांची हौस " धरून पहिलें बक्षीस मिळविलें, आणि ही शिकवण उपयुक्त करून दाखविली.

## शिकवण ९ वी.

# मित्रांवरील प्रेम.

लहान मुलांची मैत्री लवकर जमते व ती लवकर मोडतेही, यावरून त्यांचें असें एकमेकांवर जडलेलें प्रेम खरें नसून तें थोडा वेळ-पर्यंत टिकणारें, नकली प्रेम होय. मित्रावरील खऱ्या प्रेमाची परीक्षा संकटाच्या वेळीं होते. कधीं कधीं विवेकानंदांच्या मित्रांत त्यांचें कोणावर अधिक प्रेम आहे, याबद्दल मोठे कडाक्याचे वाद होत असत. कारण जो तो म्हणे कीं, विवेकानंदांचें माझ्यावरच प्रेम अधिक आहे. खरें आहे ! त्यांचें सर्वच मित्रांवर प्रेम होतें, व त्याची सत्यता अनेक बिकट आणि अडचणीच्या प्रसंगीं त्यांच्या मित्रांना पटली होती.

बरोबरची मित्रमंडळी घेऊन, ते केव्हां केव्हां यात्रेला किंवा प्रेक्षणीय स्थळें पाहण्याला जात असत. वाटेंत कोणाला दुखापत झाली, किंवा कोणी आजारी पडलें, तर त्या मित्राला सोडून, पुढें न जातां ते त्या आजारी मित्राच्या खटपटीस लागत.

एकदां बरोबर वीसपंचवीस मुलें घेऊन, कलकत्त्याचा वुइल्यम किल्ला पाहण्यास ते निघाले असतां, अशाच प्रकारचा एक प्रसंग आला. थोडें दूर गेल्यावर बरोबरचा एक मित्र आंग दुखतें म्हणून, कुरकूर करूं लागला. सर्व मुलें त्याची थट्टा करून, टर उडवूं लागलीं, आणि त्याच्या म्हणण्याकडे लक्ष न देतां, तीं पुढें निघून गेलीं. त्या

मुलाला चालण्याची शक्ति न राहिल्यामुळें तो तेथेंच जमिनीवर बसला. त्याला तें दुःख सोसवेना. विवेकानंदांनीं मध्येंच थांबून, मागें वळून पाहिलें; ते म्हणाले, 'मुलांनो, तुम्ही पुढें चला! त्याच्या मदतीला कोणी तरी गेलें पाहिजे. तरी तें काम मीं करतों.' असें म्हणून ते परत फिरले. त्या मुलाला सपाटून ताप भरला होता. शेजारींच एक गाडी उभी होती, तींत त्याला बसवून विवेकानंदांनीं त्याच्या घरीं पोहोंचविलें. अशा प्रकारच्या मित्रप्रेमाच्या अनेक गोष्टी त्यांनीं केल्या आहेत. या उपकारबुद्धीमुळेंच ते सर्व मित्रांना अतिप्रिय झाले होते.

बालपणांत उत्पन्न झालेले हे प्रेमाचे अंकूर, व मित्रासंबंधींची ही आदरबुद्धि पुढें इतकी वाढली कीं, सर्व मित्रांनीं अवघड कामांत त्यांना आपला पुढारी केलें, आणि त्यांच्या विचारें ते नेहमीं वागूं लागले, इतकेंच नव्हे तर विवेकानंदांचे विचार तेच त्यांचे विचार! व ते जें करतील तेंच ते करीत!

बालवयांत विवेकानंदांचें 'मित्रावरील प्रेम' कोणत्या प्रकारचें होतें, याचा विचार आजकालच्या बालमित्रांनीं करून, ही मित्र-प्रेमाची शिकवण नेहमीं नजरेपुढें ठेवावी.

REFBK-0005078

# मेसर्स शेख आणि गुरव यांचीं पुस्तकें.

## मुंबई, मध्यप्रांत, वऱ्हाड, करवीर, बडोदें, आंध्र सरकारांनीं मंजूर केलेलीं.

| पुस्तकाचें नांव. | किंमत आणे | कशाकरितां मंजूर. |
|---|---|---|
| हिंदुस्थानांतील मुसलमानी अमल | ४॥ | टेक्स्ट इंग्रजी १ व म० ५वी. |
| रंकाचे राव | ५ | बक्षीस लायब्ररीसाठीं |
| छोट्यांच्या मोठ्या गोष्टी भाग १ ला | ३ | पुरवणीवाचन, बक्षीस लाय० |
| मुलींची राधाबाई | ४ | बक्षीस व लायब्ररी |
| मल्लखांबाचा शिक्षक भाग १ ला | १२ | बक्षीस लायब्ररीसाठीं |
| टिपऱ्यांचा शिक्षक भा. १।२ | ४ आ.प्रत्येकीं | बक्षीस लायब्ररीसाठीं |
| म० दादाभाई नौरोजी | ३ | बक्षीस लायब्ररीसाठीं |
| बालवीर बभ्रुवाहन | ४ | बक्षीस लायब्ररीसाठीं |
| मुलींच्या टिपऱ्या भाग २ रा. | | छापत आहे. |
| लेझीमांचा शिक्षक भाग १।२ | | छापत आहे. |
| आसनांचा शिक्षक भाग १।२ | | छापत आहे. |

**सूचनाः**—छापत असलेल्या पुस्तकाबद्दल त्वरित मागणी करा आणि आगाऊ नांवें नोंदवा, प्रती फारच थोड्या काढणार आहेत.

पत्ता—**चित्रशाळा प्रेस, पुणें.**

---

मुद्रक व प्रकाशक-**शंकर नरहर जोशी**, चित्रशाळा प्रेस,
१०२६ सदाशिव पेठ, पुणें २.